महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजीनगर, पुणे-४११००५.
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र.०२०-२५५०११००
जावक क्र.मआ/साप्रवि/१३४५
दिनांक :१८/०५/२०२१.

# आदेश

विषय : आपत्ती व्यवस्थापन कायदा अन्वये सर्व नागरिकांचे प्रभावीपणे कोव्हीड लसीकरण करण्यासाठी सूचना.

संदर्भ :

१) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१.
२) भारतीय साथरोग अधिनियम १९८८.
३) आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील सूचना दि.२८ डिसेंबर २०२०.
४) आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील सूचना दि.२९ डिसेंबर २०२०.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.२६३५६४ / ४५९ / १२ दि.३.५.२०२१
६) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांचे पत्र क्र. SFWB/UIP/COVID-19/Vacincation at Workplace/D-12/ 22404-510/ Date ९.४.२०२१
७) महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५,
८) भारतीय दंड संहिता अधिनियम,
९) महाराष्ट्र शासन नागरी सेवा शिस्त व अपिल अधिनियम १९७९
१०) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

**ज्याअर्थी** पुणे जिल्हयामध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १९८८ अन्वये कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.

**आणि ज्याअर्थी** कोविड १९ या आजारावर केंद्र शासन व राज्य शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनांप्रमाणे १६ जानेवारी २०२१ पासून आरोग्य कर्मचारी (HCW), २ फेब्रुवारी पासून आघाडीचे कर्मचारी (FLW), १ मार्च २०२१ पासून ६० वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण तसेच १ एप्रिल २०२१ पासून ४५ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण आणि १ मे २०२१ पासून १८ ते ४४ वयोगटातील सर्व नागरिकांचे कोविड लसीकरण करण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी मी, **विक्रम कुमार, आयुक्त पुणे महानगरपालिका** आपत्ती व्यवस्थापन कायदा अन्वये नागरिकांचे प्रभावीपणे कोविड लसीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देत आहे.